# प्रेसनोट दि.२७/०१/२०२४

## ०२ आंतरराज्य आरोपींकडून ३२ ग्रॅम सोन्याचे दागिन्यासह एकुण २,२२,२०६/-रू किंमतीचा मुद्देमाल हस्तगत शहर गुन्हे शाखेची कामगिरी.

---

दिनांक ०८/०१/२०२४ रोजी, फिर्यादी- सौ.सावित्री नागनाथ बोगा, वय-५५ वर्ष, रा.घर नंबर ९९, आनंद विनकर सोसायटी, उत्तर सदर बझार, सोलापूर व त्यांची सुन सौ.किर्ती असे सकाळी ११.३० वा चे सुमारास घरासमोर भांडी घासत असताना, दोन अनोळखी इसम हे त्यांचेजवळ आले. त्यावेळी, त्या दोन्ही अनोळखी इसमांनी, वर नमूद फिर्यादी व त्यांचे सूनेस, "हम पिंताबरीके अॅडव्हरटाईज के लिये आए हे, तुम्हारे हातमे जो बर्तन हे, ओ दे दो" असे म्हणाले. त्यानंतर, फिर्यादी यांनी, त्या दोन्ही अनोळखी इसमांना, तांब्याची लहाण पाटी दिली. ती पाटी, त्यांनी पितांबरीने स्वच्छ करून दिली. त्यानंतर, त्या दोन अनोळखी इसमांनी, फिर्यादीस पैंजण पॉलीश करतो म्हणुन, फिर्यादीचे पायातील चांदीचे पैंजन स्वच्छ करून दिले. अशा प्रकारे, त्या दोन अनोळखी इसमांनी प्रथम फिर्यादी व त्यांचे सुनेचा विश्वास संपादन केला. त्यानंतर, त्या दोन अनोळखी इसमांनी, वर नमूद फिर्यादी व त्यांचे सूने कडून सोन्याचे दागिने पॉलिश करून देतो असे म्हणुन, त्यांचेकडून सोन्याचे दागिने घेतले. त्यानंतर, हातचलाखिने ते सोन्याचे दागिने हे, त्या दोन अनोळखी इसमांनी स्वत:कडे ठेऊन घेऊन, त्या ऐवजी एका प्लॅस्टिक पिशवीत कागदामध्ये लहान दगड गुंडाळुन, ती पिशवी फिर्यादीस दिली. त्यानंतर, काही वेळाने फिर्यादीने ती पिशवी उघडुन पाहिली असता, त्यामध्ये, फिर्यादीस केवळ दगड मिळून आला. त्यामुळे आपली फसवणूक झाल्याचे फिर्यादीचे लक्षात आले. त्यानंतर, वर नमूद फिर्यादी यांनी, या प्रकरणी, सदर बझार पोलीस स्टेशन येथे गु.र.नं.१७/२०२४ भादवि ४१९, ४२०, ३४ अन्वये तक्रार देवून गुन्हा दाखल केला आहे.

नमुद गुन्हा घडल्याची माहीती मिळताच, सदर ठिकाणी गुन्हे शाखेकडील सपोनि/संजय क्षिरसागर व पथकामधील अंमलदार यांनी घटनास्थळास भेट देऊन, सदर गुन्हा उघडकीस आणणे करीता तपास सुरू केला होता. सपोनि/संजय क्षिरसागर व त्यांचे तपास पथकाने, प्रथम आरोपीचे गुन्हा करण्याचे पध्दतीचा अभ्यास केला. त्यानंतर, सतत सुमारे १२ दिवस अथक परिश्रम घेवून, सदर गुन्हयाचे अनुषंगाने, विविध ठिकाणांना भेटी देवून, तांत्रिक विश्लेषणाचे आधारे काही माहिती प्राप्त केली. त्यानंतर, ती प्राप्त माहिती आणि बातमीदारांकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे, दि.२०/०१/२०२४ रोजी, सिध्दार्थ चौक येथुन (१) विनोद रामजी भगत, वय-३८ वर्ष, व्यवसाय-मजुरी रा.गाव-लतरा, जि.भागलपूर, राज्य-बिहार, व (२) दिपककुमार जवाहर यादव वय-२८ वर्ष, रा.गाव - जदीया, तालुका - त्रिवेनीगंज, जि.सुपौल राज्य-बिहार या दोघांना ताब्यात घेतले. त्यावेळी, त्यांचेकडे Bhaiyya CLEANING POWDER, पॉलीश करण्याचे लहाण व मोठे असे एकुण ०७ लाकडी ब्रश, छोटे पिशव्याचे पाऊच, Pitambari Rooperi ची बाटली, छोटा चिमटा, प्लॅस्टीक ची दोन छोटी टोपली व ०५ छोटया बकेट, तुरटी, हळद पावडर, Shampoo ची पुडी असे साहीत्य मिळुन आले.

सपोनि/संजय क्षिरसागर व त्यांचे तपास पथकाने, वर नमूद दोन इसमांकडे कौशल्यपुर्वक तपास केला असता, त्यांनी वरील प्रमाणे दाखल गुन्हा केल्याचे कबुल केले. त्यानंतर **त्यांचेकडून, वरील दाखल गुन्हयात फिर्यादी यांची फसवणुक करून घेऊन गेलेले एकुण ३२ ग्रॅम सोने, ०१ मोटर सायकल व गुन्हा करण्यासाठी लागणारे साहीत्य असा एकुण २,२२,२०६/-रू किंमतीचा मुद्देमाल हस्तगत** करून सदरचा गुन्हा उघडकीस आणला आहे.

सदरची कामगिरी मा.डॉ.श्री.राजेंद्र माने, पोलीस आयुक्त, सोलापूर शहर, डॉ.दीपाली काळे, पोलीस उप-आयुक्त, गुन्हे, श्रीमती प्रांजली सोनवणे, सहा.पोलीस आयुक्त, गुन्हे, श्री. सुनिल दोरगे, व.पो.नि.गुन्हे, यांचे मार्गदर्शना खाली, स.पो.नि./संजय क्षिरसागर, अनिल जाधव, राजु मुदगल, महेश शिंदे, कुमार शेळके यांनी केली आहे. तसेच सदर कामात त्यांना, दिलीप किर्दक, प्रकाश गायकवाड, अविनाश पाटील, सिध्दाराम देशमुख, अजय गुंड, बाळु काळे, सतिश काटे यांनी मदत केली आहे.

**पोलीस आयुक्त, सोलापूर शहर,**
**यांचे करीता.**

Scanned with CamScanner

